**पंतप्रधानांनी घेतली ब्राझीलच्या राष्ट्रपतींची भेट (08 जुलै 2025)**

08 जुलै 2025

पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी ब्रासिलियाच्या औपचारिक दौऱ्यावर आहेत. त्यांनी आज ब्रासिलियातील अल्व्होराडा पॅलेस येथे ब्राझीलचे राष्ट्रपती महामहिम लुईझ इनासियो लुला दा सिल्वा यांची भेट घेतली. आगमनानंतर, राष्ट्रपती लुला यांनी त्यांचे जोरदार स्वागत केले आणि त्यानंतर आकर्षक व समारंभपूर्वक स्वागत सोहळा पार पडला.

2. पंतप्रधान आणि राष्ट्रपती लुला यांनी मर्यादित आणि प्रतिनिधीमंडळ पातळीवर चर्चा केली आणि भारत आणि ब्राझील दरम्यान बहुआयामी धोरणात्मक भागीदारीच्या सर्व पैलूंवर चर्चा केली. त्यांनी जिव्हाळ्याच्या आणि मैत्रीपूर्ण भारत-ब्राझील संबंधांना अधोरेखित करणाऱ्या सामायिक मूल्यांची पुष्टी केली. व्यापार आणि गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, आरोग्य आणि औषधी, अंतराळ, अक्षय ऊर्जा, कृषी आणि अन्न प्रक्रिया, ऊर्जा सुरक्षा, पायाभूत सुविधा विकास, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा आणि UPI, पारंपारिक औषध, योग, क्रीडा संबंध, संस्कृती आणि जनतेमधील परस्पर संबंध या क्षेत्रांमध्ये सहकार्याबाबत नेत्यांनी चर्चा केली. त्यांनी महत्वपूर्ण खनिजे, नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, AI आणि सुपरकॉम्प्युटर, डिजिटल सहयोग आणि गमनशीलता यासारख्या सहकार्याच्या नवीन क्षेत्रांमध्ये सहयोगासाठी नवीन संधींचा शोध घेतला.

3. दोन्ही नेत्यांनी व्यापार आणि व्यावसायिक बाबींवर चर्चा करण्यासाठी मंत्रालयीन स्तरावरील यंत्रणा स्थापनेचे स्वागत केले. भारत-MERCOSUR प्राधान्यित व्यापार कराराचा विस्तार यासह द्विपक्षीय व्यापार मजबूत करण्यावर त्यांनी चर्चा केली. नेत्यांनी पुढील पाच वर्षांमध्ये द्विपक्षीय व्यापार 20 अब्ज डॉलर्सपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवले. ऊर्जा क्षेत्रातील वर्तमान सहकार्याचा आढावा घेत, दोन्ही नेत्यांनी हायड्रोकार्बन तसेच अक्षय ऊर्जा क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये प्रचंड क्षमता असल्याने गुंतवणुकीच्या संधींचा शोध घेण्यावर सहमती दर्शविली.

4. एप्रिल 2025 मध्ये पहलगाम मध्ये क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर भारताला दिलेल्या एकात्मता आणि पाठिंब्याबद्दल पंतप्रधानांनी ब्राझीलचे आभार मानले. हे दोन्ही देश दहशतवादाच्या सर्व स्वरूपांशी आणि प्रकटांशी लढण्यासाठी दृढपणे बांधिल असल्याचे अधोरेखित करते. दहशतवादाविषयी अजिबात सहिष्णुता नसावी आणि अशा अमानवी कृत्यांना प्रोत्साहन देणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे यावर पंतप्रधानांनी भर दिला. दहशतवादाशी लढण्यासाठी आणि त्याचा पराभव करण्यासाठी दोन्ही देशांनी एकत्र आणि जागतिक समुदायासोबत काम केले पाहिजे यावर राष्ट्रपती लुला यांनी सहमती दर्शवली.

5. दोन्ही नेत्यांनी परस्पर हिताच्या प्रादेशिक आणि जागतिक मुद्द्यांवरही विचारविनिमय केला. बहुपक्षीयता आणि संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेतील सुधारणांसह जागतिक प्रशासन संस्थांमध्ये सुधारणा, यांच्या विषयीच्या प्रतिबद्धतेचा पुनरुच्चार त्यांनी केला. हवामान बदलाला तोंड देण्यासाठी जागतिक कृती बळकट करण्यासाठी एकत्र काम करण्याचेही त्यांनी मान्य केले. पंतप्रधानांनी आगामी सीओपी30 हवामान बदल परिषदेसाठी ब्राझीलला शुभेच्छा दिल्या. ग्लोबल साउथच्या हितांना चालना देण्यासाठी जवळून काम करणे सुरू ठेवण्यास त्यांनी सहमती दर्शवली.

6. चर्चेनंतर,दहशतवाद प्रतिरोध, सुरक्षा क्षेत्रातील माहितीची देवाणघेवाण, कृषी संशोधन, अक्षय ऊर्जा, बौद्धिक संपदा अधिकार आणि डिजिटल सहकार्य [इंडिया स्टॅक] या क्षेत्रातील सहा सामंजस्य करार [तपशील येथे पाहिले जाऊ शकतात] अंतिम करण्यात आले. औपचारिक भेटीच्या निमित्ताने एक संयुक्त निवेदन [लिंक] स्वीकारण्यात आले.

7. राष्ट्रपती लुला यांनी पंतप्रधानांच्या सन्मानार्थ दुपारच्या मेजवानीचे आयोजन केले. पंतप्रधानांनी राष्ट्रपती लुला यांच्या आदरातिथ्याबद्दल आभार मानले आणि त्यांना भारत भेटीचे आमंत्रण दिले.

ब्रासिलिया

08 जुलै 2025